**<u>विशेष दिवाणी दावा क्र. ८२/२०१९ मध्ये निशाणी क्र. ३१ कडील अर्जावर</u>**

**<u>आदेश</u>**

१) वादीने प्रतिवादी क्र. ३ श्रीमती हौसाबाई जोतिराम जाधव यांच्या नावापुढे "मयत" असा शब्द घालण्यास व दाव्यामध्ये तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. ३ श्रीमती हौसाबाई जोतिराम जाधव ह्या दिनांक २९/०१/२०२२ रोजी मयत झाल्या आहेत व सदर प्रतिवादी क्र. ३ चे वारस यापूर्वीच दाव्यात पक्षकार म्हणून सामील आहेत. प्रस्तुत अर्जात अशी विनंती केली आहे की, प्रतिवादी क्र. ३ हौसाबाई जाधव यांच्या नावापुढे "मयत" असा शब्द घालण्यास परवानगी मिळावी.

२) प्रस्तुत अर्जास प्रतिपक्षाचे म्हणणे घेण्यात आले आहे. प्रस्तुत अर्जास प्रतिवादींतर्फे दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ३ चे कोणते कायदेशीर वारस याकामी सामील झाले आहेत याबाबतचा मजकूर वादीने सदर अर्जात नमूद केला नाही व त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी दोन्ही पक्षातील विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) दोन्ही पक्षातील विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुद्ध वाटपाकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. ३ श्रीमती हौसाबाई जोतिराम जाधव ह्या दिनांक २९/०१/२०२२ रोजी मयत झाल्या आहेत. वादीने निशाणी क्र. ३४ कडील यादीसोबत हौसाबाई जोतिराम जाधव यांच्या मृत्युचा दाखला दाखल केला आहे. वादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार प्रतिवादी

क्र. ३ चे वारस यापूर्वीच दाव्यात पक्षकार म्हणून सामील आहेत. प्रतिवादी क्र. ३ चे वारस यापुर्वीच दाव्यामध्ये पक्षकार म्हणून सामील आहेत ही बाब विचारात घेता व दाव्याचे स्वरुप विचारात घेता माझ्या मते प्रतिवादी क्र. ३ ही मयत झाली असल्याने तिच्या नावापुढे "मयत" हा शब्द घालण्यास परवानगी मिळण्याची वादीची प्रस्तुत अर्जातील विनंती मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) वादीने प्रस्तुत अर्जात विनंती केल्याप्रमाणेची योग्य ती दुरुस्ती वादपत्राच्या टायटल क्लॉजमध्ये करावी व त्यानंतर दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.11.06 13:28:35 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांकः– ०६/११/२०२४ २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.